**नवी मुंबई महानगरपालिका**

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, 3रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई-400614,
दिनांक : 05 मे 2016.

**स्थायी समिती**
**कार्यक्रम पत्रिका**

स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना याद्वारे असे कळविण्यात येते की, **स्थायी समितीची सन 2016-2017 या कालावधीसाठी पहिली विशेष सभा सोमवार, दिनांक 09 मे 2016 रोजी दुपारी 12.00 वाजता** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 4 थ्या मजल्यावरील **स्थायी समिती सभागृहात** पुढील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल:-

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 21 (1) अन्वये, सन 2016-2017 या एक वर्षाच्या कालावधिकरिता स्थायी समिती सभापतींची नियुक्ती करणे.
2. दिनांक 01 मे 2016 पासून स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्त झालेल्या 8 सदस्यांची यादी स्थायी समितीच्या माहितीसाठी सादर करणारे, महापालिका सचिव यांचे दिनांक 21 एप्रिल 2016 चे पत्र क्र.नमुंमपा/मस/568 /2016.

**मा.विभागीय आयुक्त,**
**कोकण विभाग यांचे आदेशावरुन**

सही/-
(चित्रा बाविस्कर)
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**

---

* सभापती पदाच्या नियुक्तीसंबंधात नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा कार्यक्रम स्वतंत्रपणे सोबत जोडला आहे. महाराष्ट्र राज्य शासनाच्या दि.17 फेब्रुवारी 2007 च्या अध्यादेशाद्वारे सुधारीत केलेल्या नियमानुसार "**हात वर करुन मतदान**" घेण्यात येईल.

<u>स्थायी समिती</u>

विषय क्र. 02 (09/05/2016)

महापालिका सचिव यांचे दिनांक 21 एप्रिल 2016 चे पत्र क्र.नमुंमपा/मस/568 /206.

"महानगरपालिकेच्या बुधवार, दिनांक 20 एप्रिल 2016 रोजी भरलेल्या सर्व साधारण सभेमध्ये दिनांक 01/05/2016 मध्यान्हापासून खालील महापालिका सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून रितसर नेमणूक झाली आहे, असा अहवाल मी स्थायी समितीच्या माहितीसाठी सादर करीत आहे :-

1. श्री. अशोक बाबुराव गुरखे,
2. श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील,
3. श्रीम. छाया केशव म्हात्रे,
4. श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील,
5. श्रीम. संगीता अशोक पाटील
6. श्री. प्रशांत धनाजी पाटील,
7. श्रीम. मिरा संजय पाटील,
8. श्री. दिपक रघुनाथ पवार

**नवी मुंबई महानगरपालिका**

**बुधवार, दिनांक 09 मे 2016 रोजी होणाऱ्या स्थायी समिती सभापती पदासाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासंबंधातील कार्यक्रम.**

| अ.क्र. | वार | दिनांक | वेळ | तपशील |
|---|---|---|---|---|
| 1. | शनिवार | 07/05/2016 | सकाळी 11.00 ते दुपारी 01.00 पर्यंत | सभापती पदाच्या नियुक्तीसाठी विहीत नमुन्यात नामनिर्देशनपत्र महापालिका सचिव यांचेकडे दाखल करणे. |
| 2. | सोमवार | 09/05/2016 | ठरलेल्या सभेच्या वेळी | वैध नामनिर्देशित उमेदवारांची यादी अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यांनी जाहीर केल्यानंतर उमेदवारी मागे घेण्यासंबंधात 15 मिनिटाचा वेळ देण्यांत येईल आणि आवश्यकता भासल्यास सभापती पदासाठी हात वर करुन मतदान घेण्यांत येईल आणि त्यानंतर निकाल जाहीर करण्यांत येईल. |

(चित्रा बाविस्कर)
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**नमुना एक**

**[नियम 3 (1) पहा]**

**नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापतीची नियुक्ती**

मी, याद्वारे श्री./श्रीमती ................................................... यांना नवी मुंबई महानगरपाकेच्या स्थायी समिती सभापतीपदाच्या नियुक्तीकरिता नामनिर्देशित करीत आहे.

उमेदवाराचे पुर्ण नांव :---------------------------------------------------

उमेदवाराचा टपालाचा संपुर्ण पत्ता :---------------------------------------------------

उमेदवारहा नगरसेवक म्हणून जेथून निवडून आला त्या प्रभागाचे/ पॅनलचे नाव/क्रमांक :---------------------------------------------------

सूचकाचे पुर्ण नांव :---------------------------------------------------

(सूचकाची सही)

अनुमोदकाचे पुर्ण नांव :--------------------------------------------------

(अनुमोदकाची सही)

दिनांक : 07/05/2016

---------------------------------------------------------------------------------------------

**उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र**

मी, याद्वारे या नामनिर्देशनाला अनुमती देत आहे आणि माझी निवड झाल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा सभापती म्हणून कार्य करण्याची तयारी दर्शवित आहे.

दिनांक : 07/05/2016 (उमेदवाराची सही)

---------------------------------------------------------------------------------------------

**(नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने भरावयाचे)**

* सुचकाने/उमेदवाराने दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक ------ (वेळ) ------ (दिनांक) 07/05/2016.

दिनांक : 07/05/2016 महापालिका सचिव

.........................................................................................................................

* लागू नसेल ते खोडावे.

**<u>उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील अर्जाचा नमुना.</u>**

दिनांक: 09/05/2016

**प्रति,**

**मा.अध्यक्ष स्थानी प्राधिकारी,**

नवी मुंबई महानगरपालिका

**महोदय,**

विशेष समिती सभापती पदासाठी होणाऱ्या निवडणूकीकरिता दाखल केलेली माझी उमेदवारी मी या पत्राद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापतीची निवडणूक घेणे) नियम 2007 चे नियम 5(3) अन्वये मागे घेत आहे.

कळावे,

दिनांक : 09/05/2016

उमेदवाराची सही

नांव ------------------------------

श्री/श्रीमती --------------------------------------------- यांना आपली उमेदवारी मागे घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.